नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे | Year - 4rd | अंक - १३० | Issue - 130 | वार - सोमवार दि. ५ ऑक्टोबर २०२६ | Blow- Monday Date 5 OCTOBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## ज्ञानेश कुमारांविरोधात विद्यार्थी संघटना रस्त्यावर; मुंबई ते दिल्लीपर्यंत एल्गार!

### तीन दिवसात तीन मोठ्या आंदोलनांची धग, विविध संघटना अन् पक्षांकडून मोर्चे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी आज मुंबईत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात विराट मोर्चा काढत हुंकार भरला. या आंदोलनात हजारो लोक सहभागी झाले होते. दोन्ही नेत्यांनी मेट्रो स्टेशनपासून बीएमसीपर्यंत मोर्चा काढला. ठाकरे बंधूंनी निवडणूक प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा आरोप करत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली. महाराष्ट्रात घेण्यात आलेली एसआयआर रद्द करावी, अशी मागणी राज ठाकरे यांनी केली. सरकार कोण स्थापन करणार याचा निर्णय जनतेचा असतो, निवडणूक आयोगाचा नाही. ज्ञानेश कुमार हे भाजपचे बाहुले असल्याचेही उद्धव ठाकरे यांनी म्हटले. गेल्या तीन दिवसांत दोन शहरांमध्ये मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधात तीन मोठी आंदोलने झाली आहेत. याशिवाय, विविध संघटना आणि पक्षांनीही मोर्चे काढले आहेत.

राज ठाकरे म्हणाले, एसआयआर प्रक्रिया रद्द केली पाहिजे. महाराष्ट्रात राबवण्यात आलेली संपूर्ण एसआयआर प्रक्रिया रद्द करावी, अशी आमची मागणी आहे. कायद्यानुसार, आणीबाणीच्या परिस्थितीत एसआयआर राबवली जाते. विधानसभा निवडणुकीदरम्यान ४० ते ६०



लाख मतदारांची नावे यादीत समाविष्ट करण्यात आली होती, ज्याचा उपयोग सत्ता मिळवण्यासाठी केला गेला. आता एसआयआरच्या माध्यमातून २ कोटी लोकांची नावे वगळली जात आहेत.

हे २ कोटी मतदार कोण आहेत? अशा सवाल त्यांनी केला. तुम्ही सरकार कसे चालवत आहात आणि सत्तेचा वापर कसा करत आहात, याबद्दल आमचा निषेध आहे.

सरकार कोण स्थापन करेल आणि ते कसे काम करेल, हे जनतेने आणि मतदारांनी ठरवले पाहिजे. हा निर्णय निवडणूक आयोगाने घेऊ नये. उद्धव ठाकरे म्हणाले, देशभरातील १३ कोटी लोकांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत. बंगाल आणि तामिळनाडूमध्येही मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. पश्चिम बंगालमध्ये सध्या पोटनिवडणुका सुरू असून, लोकांनी मतदानाच्या हक्कासाठी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. सर्वोच्च न्यायालय म्हणते की ही केवळ एक पोटनिवडणूक आहे, त्यामुळे काय फरक पडतो? उद्या सुनावणी होईल की नाही, हे देखील अद्याप ठरलेले नाही. निवडणूक आयोगाची नियुक्ती निवडणुकीद्वारे झाली पाहिजे. पूर्वी भारताचे सरन्यायाधीश, पंतप्रधान आणि विरोधी पक्षनेते यांचा समावेश असलेली एक समिती होती. त्यांनी (केंद्र सरकारने) या समितीमधून सरन्यायाधीशांना काढून टाकले. त्यांच्या जागी पंतप्रधानांनी निवडलेल्या एका मंत्र्याची नियुक्ती करण्यात आली, असे ते म्हणाले.

ज्ञानेश कुमार आणि निवडणूक आयोगावर प्रश्नचिन्ह

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि निवडणूक आयोगावर एसआयआर संदर्भात प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, निवडणूक आयुक्त सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी यांनी एसआयआरशी संबंधित निर्णय आणि आदेशांवर किमान १४ वेळा अधिकृतपणे आक्षेप नोंदवला आहे. असा दावा केला जात आहे की, संधू आणि जोशी यांच्या माहितीशिवाय किंवा शिफारशीशिवाय अनेक निर्णय आणि आदेश जारी करण्यात आले. तेव्हापासून, ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी देशभरात विरोधी पक्ष आंदोलन करत आहेत.

१० ऑक्टोबर रोजी दिल्लीत सीजेपीचे आंदोलन

दरम्यान, सीजेपीचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी २ ऑक्टोबर रोजी सांगितले की, जर ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा दिला नाही, तर देशभरातील सीजेपी १० ऑक्टोबर रोजी दिल्लीत पोहोचतील. दीपके यांनी लिहिले की, जर दिल्ली पोलिसांनी आम्हाला रोखण्याचा प्रयत्न केला, तर ते आम्हाला जिथे रोखतील, ते आमचे जंतर मंतर असेल. आमचे आंदोलन शांततापूर्ण असेल. आम्ही महात्मा गांधींनी दाखवलेल्या मार्गाचे अनुसरण करू.

## एकाही शेतकऱ्याने आयुष्य संपवलं तर त्याला बँका जबाबदार राहतील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जळगाव : राज्यात यंदा अपेक्षित पाऊस पडलेला नाही. त्यामुळे राज्यातील शेतकरी हवालदिल झाला आहे. अशा परिस्थितीत राज्य सरकारकडून कोरडा दुष्काळ जाहीर झाला आहे. राज्य सरकारमधील मंत्री विविध जिल्ह्यांचा दौरा करत आहेत. शेतकऱ्याच्या बांधावर जावून मंत्र्यांकडून पाहणी केली जात आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज जळगावात जावून जिल्ह्यातील परिस्थितीचा आढावा घेतला. यानंतर त्यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. यावेळी चंद्रशेखर बावनकुळे यांनी बँकांना मोठा इशारा दिला.



कोणत्याही बँकेने, पतसंस्थांच्या डीसीसी बँक, खासगी बँक कुणीही फायनान्सरने शेतकऱ्याला फोन करायचा नाही. एकही शेतकऱ्याला फोन केला आणि शेतकऱ्याने स्वत:ला संपवून घेतलं तर त्याला या बँका आणि त्यांचे प्रशासन जबाबदार राहतील, असा इशारा चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला.

**महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा इशारा**

मी जळगाव जिल्ह्यामधील संपूर्ण ११ विभागांची बैठक घेतली. मंत्री गिरीश महाजन, मंत्री गुलाबराव पाटील, मंत्री संजय सावकारे, केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, खासदार स्मिता वाघ, आमदार अनिल पाटील आणि सर्व लोकप्रतिनिधी होते. मुख्यमंत्र्यांनी स्वत: बांधावर जावून दुष्काळाची गंभीर अवस्था तपासली आणि २६५ तालुके दुष्काळात घेतली. जळगाव जिल्ह्यातील सर्व तालुक्यांच्या दुष्काळाचा आढावा घेतला. काही तालुकांचा उल्लेख नव्हता, त्यांचा देखील दुष्काळाच्या यादीत समाविष्ट केला आहे,अशी माहिती चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

जळगाव जिल्हाधिकारी आणि प्रशासनाच्या पूर्ण टीमने चांगल्या पद्धतीने नियोजन केले आहे. पुढच्या सहा महिन्यांचा सामना जळगाव कशा पद्धतीने करणार, शेतकऱ्यांना पाणी टंचाई कशी होणार नाही, चाऱ्याची उपलब्धता कशी राहील, अचूक पंचनामे कसे होतील, पशू संवर्धन कसं जपलं जाईल, केळीच्या नुकसानीची काय परिस्थिती आहे, त्याचा विचार केला जाईल. कापूर, तूर, सोयाबीन, उडीद या सर्व पिकांवर दुष्काळाचा काय परिणाम होईल, याचा विचार केला जाईल, असं चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं.

खासगी बँका कर्जवाटपासाठी उत्सुक नाहीत, बावनकुळेंची माहिती

खासगी बँका या कर्जवाटप करण्याकरता अजूनही उत्सुक नाहीत. सर्व बँकांना निर्देश देण्यात आले आहेत. पुढच्या पंधरा दिवसांत शेतकऱ्यांचे कर्जवाटप झाले पाहिजे. पीकविमा योजनेचा प्रश्न आहे. पीकविमाबाबत आम्ही चांगली एसओपी तयार केली आहे. पीकविमा शंभर टक्के शेतकऱ्याला मिळायला पाहिजे, यासाठी आम्ही काम करणार आहोत, अशी महत्त्वाची माहिती त्यांनी दिली.

कोणत्याही परिस्थितीत आमचे सर्व अधिकारी मुख्यालयात राहतील. जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय कुणीही गैरहजर राहणार नाही, असेही निर्देश दिल्याचं चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं.

## संकटाच्या काळात रशिया भारताच्या कायम पाठीशी राहिला, एस. जयशंकर यांचे विधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिली: दिल्लीत म्युनिच लीडर्स मीटिंग सुरु आहे. या मीटिंगमध्ये बोलताना परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर म्हणाले की, भारत आणि रशियाचे संबंध १९५० च्या दशकापासून मजबूत आहे. भारताच्या सुरक्षेला आणि प्रादेशिक अखंडतेला धोका असताना रशिया भारताच्या बाजूने उभा राहिला. त्या काळात जगातील अनेक देश पाकिस्तानच्या लष्करी राजवटीला पाठिंबा देत होते, असं त्यांनी म्हटलं.



म्युनिच लीडर्स मीटिंगमध्ये जयशंकर म्हणाले की, भारत आणि रशियामधील संबंधाचा इतिहास जुना आहे. भारताच्या सुरक्षेला आणि प्रादेशिक अखंडतेला आवाहन निर्माण झालं असताना रशिया भारताच्या पाठीशी उभा होता. त्याच काळात जगातील अनेक देश पाकिस्तानच्या बाजूने होते. त्यामुळे भारताच्या दृष्टिकोनातून रशिया सोबतच्या संबंधांना विशेष महत्त्व असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

आता हे संबंध त्याही पलीकडे विस्तारले आहेत. आज हे संबंध मोठ्या प्रमाणावर आर्थिक संबंधही आहेत. त्यामुळे यात लष्करी घटक आणि आण्विक घटक आहे, पण त्याचबरोबर दोन्ही देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर व्यापार आणि गुंतवणूक, तसेच ऊर्जा आणि संसाधने यांचाही समावेश आहे.

जयशंकर यांनी युक्रेन युद्धाचाही यावेळी उल्लेख केला. त्यांनी युक्रेनमधील युद्धबाबतही भारताची भूमिका स्पष्ट केली. जयशंकर म्हणाले, युक्रेन युद्ध संपवण्यासाठीच्या प्रयत्नांमध्ये भारताने केवळ संवाद आणि मुत्सद्देगिरीचे समर्थन करण्यापलीकडे जाऊन अधिक सक्रिय भूमिका (पान २ वर...)

## मतदानाचा हक्क काढून घेण्याची प्रक्रिया मनमानी, कोणतेही कारण याचे समर्थन करू शकत नाही, मतदानाचा हक्क नसलेले नागरिक निरर्थक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हैदराबाद : लाखो भारतीयांना त्यांच्या मतदानाच्या हक्कापासून वंचित ठेवणारी कोणतीही प्रक्रिया मनमानी आहे. अशी प्रक्रिया घटनात्मक प्रणालीलाच नाकारते. कोणतेही कारण त्याचे समर्थन करू शकत नाही, असे स्पष्ट मत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती उज्जल भुयान यांनी व्यक्त केलं आहे. न्यायमूर्ती भुयान यांनी हैदराबाद येथील नालसार विधी विद्यापीठाच्या एका कार्यक्रमात हजेरी लावली. मात्र, त्यांनी आपल्या भाषणात कोणत्याही विशिष्ट प्रक्रियेचे किंवा प्राधिकरणाचे नाव घेतले नाही.

**सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती उज्जल भुयान यांचे वक्तव्य**

**न्यायमूर्ती भुयान यांच्या भाषणातील ५ महत्त्वाचे मुद्दे...**

भारतीय संविधान नागरिकांचे दोन वर्ग निर्माण करत नाही, ज्यात एका वर्गाला मतदानाचा हक्क आहे तर दुसऱ्या वर्गाला तो नाकारला जातो. भारतीय नागरिकांना मोठ्या प्रमाणावर त्यांच्या मतदानाच्या हक्कापासून वंचित ठेवणारी कोणतीही प्रक्रिया संविधानाच्या अनुच्छेद ३२६ आणि १४ चे उल्लंघन करेल. जर एखादी प्रक्रिया लाखो भारतीय नागरिकांना त्यांच्याच देशात दुय्यम दर्जाचे नागरिक बनवत असेल, तर ती मनमानी आहे. अशी प्रक्रिया संविधानाच्या मूळ पायावरच घाव घालते. हे भारतीय संविधानाच्या घटनात्मक प्रणालीचे उल्लंघन करण्यासारखे आहे. यापासून कोणतीही संस्था सुटलेली नाही. कोणतीही सत्ता हे करू शकत नाही, कोणतेही न्यायालय याला क्षमा करू शकत नाही. कोणीही संविधानापेक्षा श्रेष्ठ नाही. तो अब्जाधीश असो वा रिक्षाचालक, दोघांनाही समान मताधिकार



न्यायमूर्ती भुयान म्हणाले, भारतीय नागरिकांचा मतदानाचा हक्क हा भारताच्या परकीय राजवटीविरुद्धच्या दीर्घ संघर्षाशी जोडलेला आहे. ही आपल्या स्वातंत्र्याची अभिव्यक्ती आहे. कलम ३२६ मध्ये कोणत्याही प्रकारे बदल केला जाऊ शकत नाही. ते म्हणाले, एक व्यक्ती अब्जाधीश असू शकते आणि दुसरी रिक्षाचालक; तरीही दोघांनाही त्यांची मते असतील आणि त्यांच्या मतांचे मूल्य समान असेल. लोकशाहीमध्ये नागरिकाचे स्थान सर्वोच्च असते, या अमेरिकन न्यायाधीश जस्टिस फेलिक्स फ्रँकफर्टर यांच्या टिप्पणीचा संदर्भ देत न्यायमूर्ती भुयान यांनी विचारले, मतदानाच्या हक्काशिवाय नागरिकाला काय किंमत आहे?

**आणखी ३ स्कॉर्पीन पाणबुड्या विचाराधीन**

**स्वदेशी लढाऊ प्रणालींचेही आधुनिकीकरण केलं जाणार**

## भारताची सागरी ताकद वाढणार! सरकार तब्बल ८० हजार कोटी रुपयांचा खर्च करणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारत आपल्या पाण्याखालील संरक्षण क्षमता वाढवण्यासाठी ८० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या एका प्रकल्पाला अंतिम मंजुरी मिळवण्याच्या जवळ आहे. या प्रकल्पांतर्गत, जर्मनीच्या भागीदारीत भारतात सहा प्रगत पारंपरिक पाणबुड्या बांधल्या जातील. आणखी तीन स्कॉर्पीन पाणबुड्या बांधण्याचा प्रस्तावही विचाराधीन आहे.

प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असलेल्या प्रकल्प-७५ (ख) अंतर्गत सहा नवीन पाणबुड्या बांधल्या जातील. हा प्रस्तावित प्रकल्प माझगाव डॉक शिपबिल्डर्स (एमडीएल) आणि जर्मन कंपनी टीकेएमएस यांची भागीदारी आहे. या पाणबुड्या भारतात बांधल्या जातील आणि यामध्ये भारतीय खाजगी क्षेत्रातील कंपन्यांचाही सहभाग असेल. संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह यांच्या म्हणण्यानुसार, प्रोजेक्ट-७५ (१) अंतिम टप्प्यात असून सक्षम प्राधिकरणाच्या अंतिम निर्णयाची प्रतीक्षा आहे. अतिरिक्त स्कॉर्पीन पाणबुड्यांचा प्रस्तावही विचाराधीन आहे, मात्र तो अद्याप त्या प्रगत टप्प्यावर पोहोचलेला नाही.



भारत सध्याच्या कलवरी-श्रेणी किंवा स्कॉर्पीन पाणबुड्यांच्या ताफ्याला पूरक म्हणून आणखी ३ पाणबुड्या बांधण्याच्या प्रस्तावावर विचार करत आहे. ह्या पाणबुड्या मुंबईस्थित एमडीएल (चउ्ङ) येथेही बांधल्या जाऊ शकतात. प्रोजेक्ट-७५ अंतर्गत भारतात आतापर्यंत सहा कलवरी-श्रेणीच्या पाणबुड्या बांधण्यात आल्या आहेत. शेवटची पाणबुडी, आयएनएस वागशीर, जानेवारी २०२५ मध्ये भारतीय नौदलात दाखल झाली होती.

सध्याच्या पाणबुड्यांमध्येही स्वदेशी एआयपी प्रणाली बसवली जाणार

नवीन पाणबुड्यांव्यतिरिक्त, सध्याच्या नौदल ताफ्याचेही आधुनिकीकरण केले जात आहे. डीआरडीओने विकसित केलेली एअर इंडिपेंडेंट प्रोपल्शन प्रणाली स्कॉर्पीन-श्रेणीच्या पाणबुड्यांमध्ये बसवली जाईल. एआयपी तंत्रज्ञानामुळे पारंपरिक डिझेल-इलेक्ट्रिक पाणबुड्यांना जास्त काळ पाण्याखाली राहण्यास मदत होते, ज्यामुळे वारंवार पाण्याच्या पृष्ठभागावर येण्याची गरज कमी होते आणि पाण्याखालील कार्यक्षमता वाढते.

संरक्षण सचिवांच्या म्हणण्यानुसार, नौदलाच्या नेव्हल फिजिकल अँड ओशनोग्राफिक लॅबोरेटरीने पाणबुड्यांसाठी एक स्वदेशी एकात्मिक लढाऊ प्रणाली देखील विकसित केली आहे. कालांतराने दुरुस्तीच्या वेळी ही प्रणाली सध्याच्या पाणबुड्यांवर स्थापित केली जाईल.

दरम्यान, भारत सरकारनं संरक्षण क्षेत्र अधिक मजबूत करण्यावर भर दिला आहे. सागरी संरक्षण क्षमता वाढवण्यासाठीचे प्रयत्न सरकारने सुरु केले आहेत. त्यासाठी सरकार विविध योजना आखत आहे. अशातच आता ८० हजार कोटी रुपये सरकार खर्च करणार आहे. प्रकल्प-७५ अंतर्गत सहा नवीन पाणबुड्या बांधल्या जाणार आहेत.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### समान मताधिकार

लाखो भारतीयांना त्यांच्या मतदानाच्या हक्कापासून वंचित ठेवणारी कोणतीही प्रक्रिया मनमानी आहे. अशी प्रक्रिया घटनात्मक प्रणालीलाच नाकारते. कोणतेही कारण त्याचे समर्थन करू शकत नाही, असे स्पष्ट मत नुकतेच सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती उज्जल भुयान यांनी व्यक्त केलं आहे. न्यायमूर्ती भुयान यांनी हैदराबाद येथील नालसार विधी विद्यापीठाच्या एका कार्यक्रमात हजेरी लावली. मात्र, त्यांनी आपल्या भाषणात कोणत्याही विशिष्ट प्रक्रियेचे किंवा प्राधिकरणाचे नाव घेतले नाही. भारतीय संविधान नागरिकांचे दोन वर्ग निर्माण करत नाही, ज्यात एका वर्गाला मतदानाचा हक्क आहे तर दुसऱ्या वर्गाला तो नाकारला जातो. भारतीय नागरिकांना मोठ्या प्रमाणावर त्यांच्या मतदानाच्या हक्कापासून वंचित ठेवणारी कोणतीही प्रक्रिया संविधानाच्या अनुच्छेद ३२६ आणि १४ चे उल्लंघन करेल. जर एखादी प्रक्रिया लाखो भारतीय नागरिकांना त्यांच्याच देशात दुय्यम दर्जाचे नागरिक बनवत असेल, तर ती मनमानी आहे. अशी प्रक्रिया संविधानाच्या मूळ पायावरच घाव घालते. हे भारतीय संविधानाच्या घटनात्मक प्रणालीचे उल्लंघन करण्यासारखे आहे. यापासून कोणतीही संस्था सुटलेली नाही. कोणतीही सत्ता हे करू शकत नाही, कोणतेही न्यायालय याला क्षमा करू शकत नाही. कोणीही संविधानापेक्षा श्रेष्ठ नाही. तो अब्जाधीश असो वा रिक्षाचालक, दोघांनाही समान मताधिकार. भारतीय नागरिकांचा मतदानाचा हक्क हा भारताच्या परकीय राजवटीविरुद्धच्या दीर्घ संघर्षाशी जोडलेला आहे. ही आपल्या स्वातंत्र्याची अभिव्यक्ती आहे. कलम ३२६ मध्ये कोणत्याही प्रकारे बदल केला जाऊ शकत नाही. ते म्हणाले, एक व्यक्ती अब्जाधीश असू शकते आणि दुसरी रिक्षाचालक; तरीही दोघांनाही त्यांची मते असतील आणि त्यांच्या मतांचे मूल्य समान असेल. लोकशाहीमध्ये नागरिकाचे स्थान सर्वोच्च असते,

# अभिजात मराठी : संस्कारांची, संवेदनांची आणि सर्जनशीलतेची ओळख

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

३ ऑक्टोबर अभिजात मराठी भाषा दिन! हा केवळ गौरवाचा दिवस नाही, तर आपल्या भाषिक वारशाची जाणीव करून देणारा संकल्पदिन आहे. सुमारे २५०० वर्षांच्या भाषिक-सांस्कृतिक परंपरेचा वारसा लाभलेल्या मराठीने काळानुरूप स्वतःला समृद्ध केले आहे. ती मातृभाषा आहे, राजभाषा आहे, व्यवहाराची भाषा आहे आणि ज्ञाननिर्मितीची समर्थ ज्ञानभाषाही आहे.

मुकुंदराजांपासून आधुनिक ज्ञान-विज्ञानापर्यंतचा तिचा प्रवास तिच्या अभिजाततेची साक्ष देतो. या वैभवाचा अभिमान बाळगताना मराठी वाचणे, लिहिणे, विचार करणे आणि मराठीतून नवे ज्ञान निर्माण करणे, हीच तिच्याप्रती खरी भाषासेवा आहे.

मातीतल्या कणाकणातून उमललेला प्रत्येक शब्द म्हणजे मराठी,

जगण्याच्या प्रत्येक क्षणात झिरपणारा आत्मस्वर म्हणजे मराठी!

मराठी ही केवळ संवादाची भाषा नाही; ती संस्कारांची, संस्कृतीची, संवेदनांची आणि स्वाभिमानाची आओळख आहे. तिच्या प्रत्येक अक्षरात इतिहास आहे, प्रत्येक शब्दात मातीचा गंध आहे आणि प्रत्येक वाक्यात जीवनाचा अनुभव सामावलेला आहे. म्हणूनच ३ ऑक्टोबरच्या अभिजात मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने मराठीच्या अभिजाततेचा गौरव करताना तिच्या समृद्ध परंपरेचे स्मरण आणि तिच्या भविष्याची जबाबदारी या दोन्ही गोष्टी तितक्याच महत्त्वाच्या ठरतात.

'अभिजात' या शब्दात केवळ प्राचीनता नाही, तर प्राचीनता, सातत्य, समृद्ध साहित्यपरंपरा, स्वतंत्र भाषिक वैशिष्ट्ये, ज्ञाननिर्मितीची क्षमता आणि काळानुसार स्वतःला विकसित करण्याचे सामर्थ्य सामावलेले आहे. मराठीची अभिजातता याच बहुआयामी परंपरेतून सिद्ध होते. सुमारे २५०० वर्षांच्या भाषिक-सांस्कृतिक प्रवासात मराठीने अनेक स्थित्यंतरे अनुभवली, विविध भाषिक प्रवाह आत्मसात केले आणि तरीही आपली स्वतंत्र ओळख जपली.

संस्कृत, महाराष्ट्री प्राकृत, अपभ्रंश आणि प्राचीन मराठीच्या विविध रूपांतून मराठीची भाषिक घडण होत गेली. महाराष्ट्राच्या भूमीत लोकव्यवहारातून विकसित झालेल्या या भाषेने पुढे साहित्य, तत्त्वज्ञान, धर्म, प्रशासन, पत्रकारिता आणि ज्ञान-विज्ञानाच्या क्षेत्रातही आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले.

या प्रदीर्घ प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे आद्यकवी मुकुंदराजांचा 'विवेकसिंधू'. तत्त्वज्ञानासारखा गहन विषय मराठीतून मांडण्याची समर्थता या ग्रंथातून दिसून येते. त्यामुळे मराठी ही केवळ व्यवहाराची भाषा नसून गंभीर चिंतन आणि ज्ञान व्यक्त करण्याची समर्थ भाषा आहे, हे स्पष्ट होते. महानुभाव परंपरेतील 'लीळाचरित्र' यांसारख्या ग्रंथांनी मराठी गद्याच्या विकासाला महत्त्वपूर्ण दिशा दिली. मराठीचे वैभव म्हणूनच केवळ काव्यात नाही; ते गद्य, तत्त्वज्ञान, चरित्र, धर्मचिंतन आणि लोकजीवनाच्या अभिव्यक्तीतही आहे.

मराठीच्या वैभवशाली परंपरेत संत ज्ञानेश्वरांची 'ज्ञानेश्वरी' हा एक मैलाचा दगड आहे. गहन तत्त्वज्ञान लोकभाषेत आणून ज्ञानेश्वरांनी मराठीला विचार आणि अध्यात्माची प्रभावी भाषा बनवले. संत नामदेव, संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत गोरा कुंभार, संत सावता माळी, संत चोखामेळा, संत नरहरी सोनार, संत सेना न्हावी, संत कान्होपात्रा, संत सोयराबाई, संत एकनाथ, संत तुकाराम, संत रामदास ,संत बहिणाबाई आणि अन्य संतांनी मराठीतून भक्तीबरोबरच समता, माणुसकी, आत्मपरीक्षण आणि सामाजिक जाणिवांचे संस्कार केले. महाराष्ट्राच्या संतपरंपरेत विविध सामाजिक स्तरांतील स्त्री-पुरुष संतांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले, हे तिचे व्यापक लोकाभिमुख स्वरूप अधोरेखित करते.

या परंपरेत समर्थ रामदास स्वामींचे योगदानही वैशिष्ट्यपूर्ण आहे. दासबोध, मनाचे श्लोक आणि अन्य साहित्याच्या माध्यमातून त्यांनी विवेक, सदाचार, कर्तृत्व, आत्मशिस्त आणि समाजजीवनाविषयीचे विचार प्रभावीपणे मांडले. दासबोधात मानवी सद्गुणांची वाढ व्हावी आणि माणूस कर्तृत्वसंपन्न व्हावा, अशी समर्थांची तळमळ दिसून येते.

संत ज्ञानेश्वरांपासून नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास आणि पुढे गाडगे महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्यापर्यंत आलेल्या या परंपरेने भक्तीला सामाजिक आशयाची जोड दिली. अंधश्रद्धा, विषमता, अहंकार आणि सामाजिक विसंगतींवर भाष्य करत माणुसकी, समता, बंधुभाव, कर्तव्य आणि नैतिकतेचा संदेश जनमानसापर्यंत पोहोचवला. या संतांनी केवळ साहित्यनिर्मिती केली नाही; तर संतसाहित्यातून प्रबोधनाचे नवे पर्व उभे केले आणि समाजमनाला विचारांची दिशा दिली. हीच मराठी संतपरंपरेची सर्वांत मोठी सामाजिक आणि सांस्कृतिक देणगी आहे.

मराठीची वाटचाल केवळ संतपरंपरेतून झालेली नाही. पंडिती काव्याने मराठीला संस्कृत साहित्यपरंपरेतील शास्त्रीयता, छंद, अलंकार आणि विद्वत्तेचा समृद्ध वारसा दिला. वामन पंडित, रघुनाथ पंडित आणि मोरोपंत यांसारख्या कवींनी मराठी काव्याला वेगळे सौंदर्य आणि शास्त्रनिष्ठ अभिव्यक्ती दिली. एकीकडे संतांचे सहज आणि अनुभवप्रधान साहित्य, तर दुसरीकडे पंडिती काव्याची अलंकारिक आणि छंदोबद्ध परंपरा या दोन्ही प्रवाहांनी मराठीच्या अभिव्यक्तीविश्वाला विलक्षण विस्तार दिला.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यनिर्मितीच्या काळात मराठीला प्रशासन, राजकारभार आणि लोकव्यवहारात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. राजव्यवहारासाठी आवश्यक परिभाषा आणि लेखनपद्धती विकसित करण्याचे प्रयत्न झाले. स्वराज्याची संकल्पना ही केवळ राजकीय नव्हती; ती लोकांच्या अस्मितेशी, संस्कृतीशी आणि भाषेशी जोडलेली होती. त्यामुळे मराठीने राज्यकारभाराच्या क्षेत्रातही आपली क्षमता सिद्ध केली. पुढे महाराष्ट्राची राजभाषा म्हणून तिला संस्थात्मक अधिष्ठान मिळाले आणि शासन-प्रशासनातील तिचे महत्त्व अधिक दृढ झाले.

मराठीच्या लोकाभिमुख परंपरेत शाहिरी वाययाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. पोवाडा, लावणी आणि लोककाव्याच्या विविध रूपांतून महाराष्ट्राचे शौर्य, संघर्ष, लोकजीवन आणि सामाजिक वास्तव व्यक्त झाले. राम जोशी, अनंत फंदी, होनाजी बाळा यांच्यापासून पुढे आलेल्या या परंपरेला सामाजिक परिवर्तनाचीही दिशा मिळाली.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्य आणि शाहिरीतून श्रमिक, कष्टकरी आणि वंचितांच्या जीवनाला शब्द दिले. शाहीर अमर शेख यांनी शाहिरीच्या माध्यमातून सामाजिक जाणीव आणि लोकजागृतीला प्रभावी आवाज दिला. शाहीर गव्हाणकर यांनीही लोकपरंपरा आणि सामाजिक आशय यांचा मेळ घालत शाहिरी परंपरेला समृद्ध केले. संतांनी अंतर्मन जागवले, पंडितांनी बुद्धीला चालना दिली आणि शाहिरांनी जनमनाला चेतवले या विविध प्रवाहांचा संगम म्हणजे मराठीचे वैभव.

आधुनिक काळात मुद्रण, शिक्षण, पत्रकारिता आणि सामाजिक सुधारणांच्या चळवळींमुळे मराठीला नवे परिमाण मिळाले. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी मराठी गद्याला वैचारिक धार दिली, तर लोकमान्य टिळकांच्या पत्रकारितेने मराठीला जनजागृतीचे प्रभावी सामर्थ्य दिले. आचार्य प्र. के. अत्रे यांनी पत्रकारिता, साहित्य, नाटक, व्यंग्य-विनोद आणि प्रभावी वक्तृत्वाच्या माध्यमातून मराठीला प्रबोधन आणि जनमत जागृतीचे समर्थ माध्यम बनवले.

याच आधुनिक साहित्यप्रवाहात बालकवी त्र्यंबक बापूजी ठोमरे यांनी आपल्या निसर्गप्रेमी आणि भावस्पर्शी कवितेतून मराठी काव्याला कोमल संवेदनांचे अद्वितीय सौंदर्य दिले. केशवसुतांनी आधुनिक मराठी कवितेच्या नव्या युगाची चाहूल दिली. पुढे गोविंदाग्रज, भा. रा. तांबे, साने गुरुजी, वि. स. खांडेकर, कुसुमाग्रज, पु. ल. देशपांडे, ग. दि. माडगूळकर, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, ना. धों. महानोर , नामदेव ढसाळ आणि असंख्य साहित्यिक-कवींनी मराठीच्या अभिव्यक्तीचे क्षितिज विस्तारले.

कथा, कादंबरी, कविता, नाटक, ललितलेखन, पत्रकारिता, बालसाहित्य, ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी आणि विज्ञान साहित्य अशा विविध प्रवाहांनी मराठीला समाजातील असंख्य अनुभव आणि विचारांशी जोडले. त्यामुळे मराठी ही केवळ परंपरेची भाषा न राहता सतत विकसित होणाऱ्या समाजाच्या विचारांची, संवेदनांची, संघर्षांची आणि स्वप्नांची भाषा बनली आहे.

मराठीचे खरे सामर्थ्य तिच्या विविध भूमिकांमध्ये आहे. ती आपल्या भावविश्वाची मातृभाषा आहे; महाराष्ट्राच्या प्रशासनाची राजभाषा आहे; दैनंदिन जीवनातील संवादाची व्यवहाराची भाषा आहे आणि ज्ञान-विचार-संशोधन व्यक्त करण्याची क्षमता असलेली ज्ञानभाषा आहे. या चारही भूमिकांचा समन्वय म्हणजे मराठीच्या सामर्थ्याची खरी ओळख.

आज मराठीसमोरचे खरे आव्हान केवळ तिच्या वापराचे नाही, तर ज्ञाननिर्मितीचे आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, वैद्यक, कृषी, कायदा, अर्थशास्त्र, संगणक आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या आधुनिक क्षेत्रांतील ज्ञान मराठीत उपलब्ध झाले पाहिजे. मातृभाषेतून शिक्षण घेताना संकल्पना अधिक सहजपणे समजतात. त्यामुळे मराठीला केवळ भावनेची भाषा न ठेवता सक्षम ज्ञानभाषा बनवणे आवश्यक आहे.

शिक्षकांनी मराठीतून लिहावे, विद्यार्थ्यांनी मराठीतून प्रश्न विचारावेत, संशोधकांनी मराठीतून ज्ञान मांडावे आणि तंत्रज्ञानाने मराठीला आधुनिक जगातील सक्षम कार्यभाषा बनवावे. नवे शब्द, नवी परिभाषा आणि नवे विचार मराठीत निर्माण झाले तरच तिची अभिजात परंपरा भविष्यकाळात अधिक समृद्ध होईल.

मराठी अभिजात का आहे, याचे उत्तर केवळ तिच्या प्राचीनतेत नाही. प्राचीन भाषिक परंपरेचा अखंड वारसा, सुमारे २५०० वर्षांची भाषिक-सांस्कृतिक परंपरा, समृद्ध आणि वैविध्यपूर्ण साहित्यनिर्मिती, स्वतंत्र अभिव्यक्तीची क्षमता, संतवाययापासून आधुनिक साहित्यापर्यंतची सातत्यपूर्ण परंपरा आणि काळानुसार नव्या ज्ञानक्षेत्रांना सामावून घेण्याची क्षमता या सर्वांचा एकत्रित विचार केला तर मराठीचे अभिजातत्व अधिक ठळकपणे जाणवते.



मुकुंदराजांचे तत्त्वचिंतन, महानुभावांचे गद्य, ज्ञानेश्वरीचे तत्त्वज्ञान, संतांचे अभंग, समर्थ रामदासांचे प्रबोधनपर वायय, पंडिती काव्याची शास्त्रीयता, शाहिरांची लोकजागृती, अत्रे-चिपळूणकर-टिळकांची वैचारिक पत्रकारिता, बालकवींपासून आधुनिक कवी-लेखकांपर्यंतची सर्जनशील परंपरा आणि आजच्या विज्ञान-तंत्रज्ञानातील मराठीचा विस्तार हा प्रदीर्घ आणि वैविध्यपूर्ण वारसा मराठीच्या अभिजाततेचा गौरवशाली पुरावा आहे.

भाषेचे संवर्धन मोठ्या घोषणांमधून होत नाही; ते घरातील संवादातून सुरू होते. पालकांनी मुलांशी मराठीत बोलावे, मुलांना मराठी पुस्तके वाचण्याची सवय लावावी, शिक्षकांनी वाचनाची गोडी निर्माण करावी आणि शाळांनी समृद्ध ग्रंथालये उभी करावीत. आज सामाजिक माध्यमे, ई-पुस्तके, संकेतस्थळे, पॉडकास्ट आणि डिजिटल शिक्षणामुळे मराठी जगभर पोहोचण्याची संधी निर्माण झाली आहे. या संधीचा उपयोग दर्जेदार मराठी साहित्य, ज्ञान आणि विचार जगापर्यंत पोहोचवण्यासाठी झाला पाहिजे.

इतर भाषा शिकणे ही ज्ञानाची श्रीमंती आहे. मात्र इतर भाषा आत्मसात करताना मातृभाषेपासून दूर जाणे योग्य नाही. बहुभाषिक होऊया पण मातृभाषेतून विचार करण्याची क्षमता जपूया.

३ ऑक्टोबरचा अभिजात मराठी भाषा दिन हा केवळ गौरवाचा दिवस न राहता कृतीचा दिवस व्हावा. हजारो वर्षांच्या भाषिक-सांस्कृतिक प्रवासातून घडलेली मराठी पुढील पिढीपर्यंत अधिक समृद्ध स्वरूपात पोहोचवायची असेल, तर तिचा वापर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात वाढवावा लागेल.

म्हणून या अभिजात मराठी भाषा दिनानिमित्त सहा साधे पण प्रभावी संकल्प करूया . मराठी वाचूया, मराठी लिहूया, मराठी शिकूया, मराठी शिकवूया, मराठीतून विचार करूया आणि मराठीतून नवे ज्ञान निर्माण करूया. भाषेचा वारसा फक्त जपायचा नसतो; तो पुढे नेण्यासाठी नवे शब्द, नवे विचार आणि नवे ज्ञान निर्माण करावे लागते. मराठी माझी मातृभाषा आहे, माझा संस्कार आहे, माझी व्यवहाराची भाषा आहे, माझ्या अस्मितेची राजभाषा आहे आणि नव्या भविष्याची ज्ञानभाषा आहे.

अभिजात मराठीचा गौरव म्हणजे केवळ भूतकाळाची आठवण नव्हे; तो भविष्य घडविण्याचा संकल्प आहे.

मराठी जपूया, मराठी जगवूया, मराठीतून विचार करूया आणि मराठीतून नवे ज्ञान निर्माण करून अभिजात मराठीचा वारसा पुढच्या पिढीकडे अभिमानाने सोपवूया!

**– भैरवनाथ कानडे**
**सदस्य, जिल्हा मराठी भाषा समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव**
**सहशिक्षक .श्री . भैरवनाथ माध्यमिक विद्यालय चिकुंद्रा, ता. तुळजापूर, जि. धाराशिव**
९८६०३४४०७३

# भारतीय संस्कृतीचा सन्मान म्हणजे 'वंदे मातरम्' : स्वानंद बेदरकर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट प्रतिनिधी येथील विवेकानंद प्रतिष्ठानच्या गणेशोत्सव व्याख्यानमालेतील पाचवे पुष्प लेखक, कवी व व्याख्याते स्वानंद बेदरकर यांनी 'वंद्य वंदे मातरम्' या विषयावर गुंफले. या वेळी त्यांनी 'वंदे मातरम्'च्या निर्मितीपासून त्यामागील राष्ट्रभावना, साहित्यिक संदर्भ आणि हिंदू संस्कृतीशी असलेले नाते यांचा सविस्तर उलगडा केला. भारतीय संस्कृतीचा सन्मान म्हणजे वंदे मातरम असे प्रतिपादन त्यांनी केले.

'वंदे मातरम्'चे रचनाकार बंकिमचंद्र चॅटर्जी, त्यांची साहित्यकृती 'आनंदमठ' आणि त्यातून समोर आलेले 'वंदे मातरम्' यांचा ऐतिहासिक संदर्भ बेदरकर यांनी व्याख्यानातून मांडला. 'वंदे मातरम्' हे गीत भारतीय स्वातंत्र्यलढ्यात प्रेरणेचा स्रोत कसे ठरले, त्यामागील राष्ट्रभावना कशी विकसित झाली याचे विवेचन त्यांनी केले. हिंदू संस्कृती आणि 'वंदे मातरम्' यावरही बेदरकर यांनी प्रकाश टाकला. भारतीय संस्कृतीतील मातृभूमीविषयीची श्रद्धा, तिचे केलेले गौरवीकरण आणि 'वंदे मातरम्'मधून व्यक्त झालेली मातृभूमीची संकल्पना यांचा परस्परसंबंध त्यांनी विविध संदर्भांच्या आधारे स्पष्ट केला.

बंकिमचंद्र चॅटर्जी यांच्या लेखनाचा काळ, 'आनंदमठ'मधील 'वंदे मातरम्'चे स्थान आणि पुढे स्वातंत्र्य चळवळीत या गीताला प्राप्त झालेले महत्त्व यांचा मागोवा घेताना बेदरकर यांनी इतिहास आणि साहित्य यांची सांगड घातली. ओघवत्या वक्तृत्वातून त्यांनी विषयाची मांडणी केली. त्यांच्या अभ्यासपूर्ण विवेचनाला उपस्थित श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. बंकिमचंद्र चॅटर्जी यांच्या गीताला १५० वर्षे पूर्ण झाली.

या व्याख्यानास आमदार सचिन कल्याणशेट्टी,मल्लिनाथ कल्याणशेट्टी, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, भीमराव साठे, राजशेखर मसुती, प्रभाकर मजगे, अशोक येणगुरे, महेश कापसे, बापूजी निंबाळकर, दिनेश पटेल, चंद्रकांत दसले, शशिकांत लिंबितोटे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तालुका कार्यवाह चेतन जाधव, आदित्य जोशी, विलास कोरे, दिगंबरराव डांगे, मल्लिनाथ स्वामी आदी उपस्थित होते.

# संकटाच्या काळात रशिया भारताच्या कायम पाठीशी राहिला, एस. जयशंकर यांचे विधान

(पान १ वरून...) घेतली आहे. ते म्हणाले की, भारताने गेल्या काही महिन्यात कीव आणि मॉस्को या दोन्ही देशांशी चर्चा केली. या संघर्षातून निर्माण होणाऱ्या काही तात्काळ चिंता दूर करण्याचा प्रयत्न करत आहे.

या संघर्षावर आमची भूमिका अगदी स्पष्ट आहे, ती म्हणजे हा संघर्ष संपुष्टात यावा अशी आमची इच्छा आहे. यासाठी संवाद आहे मुत्सद्देगिरीची आवश्यकता असेल. या संदर्भात वाटाघाटी होणे आवश्यक आहे असेही ते म्हणाले. या संदर्भात आम्ही रशिया आणि युक्रेन या दोन्ही देशांशी चर्चा करत आहोत आणि मदत करण्याचा प्रयत्न करत आहोत, याची सुरुवात काळा समुद्रातील जहाजांच्या सुरक्षिततेच्या मुद्द्यांपासून होत आहे, असेही ते म्युनिच लीडर्स मीटिंगमध्ये म्हणाले.

# कोल्हापुर ते ३१ ग्रामीण साहित्य संमेलन मोठ्या उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर - कोल्हापूर येथे एकतीसावे ग्रामीण साहित्य संमेलन मोठ्या उत्साहात जल्लोषात पार पडले, दिनांक ४ सप्टेंबर २०२६ रोजी के एस आय पब्लिकेशन द्वारा भारत मंदिर सभागृह महात्मा गांधी मैदान जवळ कोल्हापूर येथे सकाळी दहा ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत झालेल्या साहित्य संमेलनात कथाकथन कवी संमेलन विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी केलेल्या मान्यवरा ंच्या महात्मा गांधी साहित्यभूषण पुरस्कार वितरण सोहळा पुस्तक प्रकाशन, स्मरणिका प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले अशा विविध कार्यक्रमाने साहित्याची नेमणूक संपन्न झाले.

सुरुवातीच्या मान्यवरांच्या हस्ते सरस्वती प्रतिमा पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांच्या स्वागत व सत्कार होऊन कवी इंगळी सरकार विलास पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकास साहित्य संमेलनाला आलेल्या साहित्यकांना काही सूचना दिल्या. पूजा पहिल्या सत्राच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब देशमुख यांनी केले, तर विनायक कुलकर्णी यांच्या हस्ते काही पुस्तकाची प्रतिनिधी काव्यसंग्रहाचे मरनिकेचे प्रकाशन करण्यात आले स्वागत अध्यक्ष दशरथ धायगुडे यांनी कोल्हापूर शहराची अध्यात्मिक माहिती सांगून एक गोंधळ गीत गायली कथा कथनांच्या कार्यक्रमात बाळासाहेब देशमुख यांनी मंतरलेला वाडा ही लक्षवेधी कथाकथन केली, यावेळी प्रमुख पाहुणे विनायक कुलकर्णी यांनी सांगितले की साहित्यकांना लिहिण्यासाठी दैवी शक्ती लाभलेले असती तर संमेलन अध्यक्ष दत्तात्रय वारकड यांनी सांगितले की विचार माणसाला घडू तोही आणि बिघडू तोही साहित्यिकांनी कॅप्टन ची भूमिका पार पाडून युवकांना मार्गदर्शन करावी साहित्यिकांच्या विचारांचा अविष्काराने समाज घडतो शोध विचारांच्या माध्यमातून होतो कवी सतत जागृत असतो लेखणीत मोठी ताकद असते, साहित्य समाजाला दिशा देण्याचे काम करते, ए .आय. डिजिटल युगात ही साहित्यिक प्रगतीपथावर आहेत सिने निमर्ति दिग्दर्शक काशिनाथ आहेर यांनीही यावेळी मार्गदर्शन केले स्नेह भोजनाचा आस्वाद घेतल्यानंतर कवी संमेलनाला सुरुवात झाली व यामध्ये अनेक कवी कवित्रींनी शेतकरी दुष्काळ नातेसंबंध प्रेम, विनोदी, गंभीर अशा विविध विषयांवरील व विविध अश्यांच्या कविता सादर केल्या. भारत कवितके मला काय माहित? ही सतत तारुण्यात वावरणारी काहीशी विनोदी तर काहीशी गंभीर स्वरूपाची जवळजवळ ५० वर्षांपूर्वीची वास्तववादी कविता सादर करून रसिकांची मनीष जिंकली, कवी संमेलनाच्या अध्यक्षा मेगा ऊळगड्डे होत्या.

यावेळी मनीषा कांबळे भाऊसाहेब कांबळे सुरेखा वाडकर मनीषा वरळी माधुरी पंडित ज्ञानेश्वर धायरीकर, कामात सर व इतर कवी कवित्री यांनी कविता सादर केल्या तर या कवी संमेलनाचे सूत्रसंचालन अतिशय मार्मिकपणे सर्व कवितेचे योग्य विश्लेषण करीत करीत केले व त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधी साहित्य भूषण पुरस्कार वितरण सोहळा साजरा झाला.

मुंबई प्रतिनिधी पत्रकार साहित्यिक गीतकार सामाजिक कार्यकर्ते भारत कवितके यांना त्यांच्या आयुष्य हसवताना आत्मचरित्रास महात्मा गांधी साहित्य भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# दुष्काळात महिलांच्या हाताला काम नाही, हप्ते भरणे झाले कठीण; कर्जदार महिला अडचणीत

## मायबाप सरकार, ऐकताय ना? दुष्काळात 'मायक्रो फायनान्स'ची वसुली थांबणार का?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा : प्रतिनिधी अमर जाधव - राज्यात दुष्काळी परिस्थिती जाहीर झाल्यानंतर शेतकरी व ग्रामीण भागातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी शासनाने विविध उपाययोजना जाहीर केल्या आहेत. बँकांकडून होणारी सक्तीची कर्जवसुली थांबवण्याचे निर्देश, शाळा-महाविद्यालयांच्या शुल्काबाबत सवलत, वीजबिलांबाबत सवलत तसेच प्रतिबंधात्मक आर्थिक सहाय्याची घोषणा करण्यात आली आहे. रोजगाराचा प्रश्न गंभीर झाल्याने रोजगार हमीची कामे सुरू करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. मात्र, ग्रामीण भागात मोठ्या




प्रमाणावर कार्यरत असलेल्या मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या कर्जवसुलीचा प्रश्न अद्याप कायम आहे.

ग्रामीण भागातील विशेषतः महिलांनी विविध मायक्रो फायनान्स संस्थांकडून कर्ज घेतले आहे. या कर्जाची दैनिक.साप्ताहिक अथवा मासिक हप्त्यांद्वारे परतफेड केली जाते. मात्र, दुष्काळामुळे शेती-चे उत्पन्न घटले असून ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही मोठा परिणाम झाला आहे. अनेक कुटुंबांच्या हाताला रोजगार नसल्याने नियमित हप्ते भरणे महिलांसाठी अडचणीचे ठरत आहे.

**उत्पन्नाचे मार्ग बंद, मग कर्जाचा हप्ता भरणार तरी कसा?**

ग्रामीण भागातील महिलांच्या बचतगटांसह विविध माध्यमातून मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून कर्ज उपलब्ध करून दिले जाते. मात्र, कर्ज घेतल्यानंतर दर आठवड्याला अथवा मासिक हप्त्यांद्वारे परतफेड केली जाते. मात्र, दुष्काळामुळे शेतीचे उत्पन्न घटले असून ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही मोठा परिणाम झाला आहे.

अनेक कुटुंबांच्या हाताला रोजगार नसल्याने नियमित हप्ते भरणे महिलांसाठी अडचणीचे ठरत आहे.

सध्या दुष्काळी परिस्थितीत रोजगार व उत्पन्नाची साधने कमी झालेली असताना हप्ते भरण्यासाठी महिलांवर आर्थिक दबाव वाढत असल्याची चर्चा आहे. शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण भागातील युवकांप्रमाणे महिलांनाही रोजगाराचा मोठा प्रश्न भेडसावत आहे. त्यामुळे शासनाने बँकांच्या कर्जवसुलीबाबत घेतलेल्या निर्णयाच्या धर्तीवर मायक्रो फायनान्स संस्थांच्या कर्जाच्या सक्तीच्या वसुलीलाही तात्पुरती स्थगिती द्यावी, अशी मागणी ग्रामीण भागातून होत आहे.

**दुष्काळात शासनाने दिलासा दिला, मायक्रो फायनान्सच्या वसुलीला सूट का नाही?**

दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांना शासनाच्या विविध उपाययोजनांमधून दिलासा देण्याचा प्रयत्न सुरू असताना मायक्रो फायनान्सच्या हप्त्यांचा ताण कायम राहिल्यास आर्थिक अडचणीतील कुटुंबांवर अतिरिक्त भार पडू शकतो. त्यामुळे दुष्काळी परिस्थिती संपेपर्यंत किंवा रोजगार व उत्पन्नाची परिस्थिती पूर्वपदावर येईपर्यंत मायक्रो फायनान्स कर्जाच्या सक्तीच्या वसुलीला स्थगिती, व्याजाबाबत सवलत आणि हप्ते पुनर्नियोजित करण्याबाबत शासनाने स्पष्ट निर्णय घ्यावा, अशी मागणी होत आहे.

**सरकारने कंपन्यांना आदेश द्यावेत**

दुष्काळामुळे शेतातील कामे बंद झाली आहेत. अशा परिस्थितीत नियमित कर्जाचे हप्ते भरणे महिलांसाठी कठीण झाले आहे. तरीही मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून वसुलीचा तगादा सुरूच आहे. लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने बैठक घेऊन संबंधित कंपन्यांना योग्य निर्देश द्यावेत..... अशी मागणी ग्रामीण भागातील महिलाकडून केली जातेय....

## पिकांचे सरसकट पंचनामे, व आठ तासाची वीज पुरवठ्यासह, पिण्याची पाणी टँकर सुरू करण्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर - पंढरपूर तालुक्यातील तीव्र दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्याची पालकमंत्री नामदार जयकुमार जी गोरे यांनी पाहणी केली आता यावेळी विधानपरिषदेची माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांनी दुष्काळाची पाहणी दौऱ्या दरम्यान तालुक्यातील विविध समस्या व महत्त्वाच्या मागण्या पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे मांडले आहेत.

आज गार्डी पाटिल तालुका



आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख, माजी आमदार शहाजी बापू पाटील, माजी आमदार दीपक साळुंखे, सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मा.आ. प्रशांत परिचारक यांची पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे मागणी

पंढरपूर येथील पालकमंत्री नामदार जयकुमार गोरे यांनी दुष्काळी परिस्थितीची थेट पाहणी करून शेतकरी बांधवांशी संवाद साधला, याप्रसंगी पंढरपूर तालुक्यातील सद्यस्थितीची सविस्तर माहिती घेऊन बळीराजाला तातडीने दिलासा देण्यासाठी माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांनी त्यांच्याकडे मांडले आहेत.

यावेळी सांगोला तालुक्याची

## जि.प. शाळेतर्फे वागदरी गावचे सुपुत्र संतोष गुमास्ते यांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आपल्या वागदरी गावचे सुपुत्र सन्माननीय श्री. संतोष गुमास्ते साहेब प्रमुख असलेल्या श्री.किर्लोस्कर कंपनीच्या माध्यमातून जिल्हा परिषद प्राथमिक मराठी मुला मुलींची शाळा वागदरीच्या शाळेस संपूर्ण रंगकाम करण्यात आले. त्याबद्दल जिल्हा परिषद प्राथमिक मराठी मुला मुलींच्या शाळेतर्फे श्री. ऋषिकेश कुलकर्णी साहेब( किर्लोस्कर कंपनी मॅनेजर ), किर्लोस्कर कंपनीचे श्री. अनंत जाधव साहेब, श्री. गुलाब राजपूत साहेब, श्री.देशपांडे साहेब या सर्व मान्यवरांचा छोटेखानी सत्कार करण्यात आला. यावेळी मुलांच्या शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अनुसया कलशेट्टी मॅडम, मुलींच्या शाळेचे मुख्याध्यापक श्री. बाबासाहेब बनसोडे सर, श्री. शिवानंद पाटील सर, गौडगाव प्रशालेमध्ये शिक्षक म्हणून कार्यरत असलेले आपल्या वागदरी गावचे सुपुत्र श्री. शिवपुत्र चोल्ले सर, गोगावचे उपसरपंच श्री. कमलाकर सोनकांबळे साहेब, श्री. महादेव सोनकवडे यांच्यासह व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष(मुली ) श्री. मारुती शिंदे उपस्थित होते.




## कर्मयोगी विद्यानिकेतनमध्ये महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती उत्साहात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर - येथील श्री पांडुरंग प्रतिष्ठान संचालित कर्मवीर विद्यानिकेतन पंढरपूर येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली या विशेष कार्यक्रमाला लायन्स क्लब पंढरपूर ड्रीमची पदाधिकारी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते महापुरुषांच्या जयंतीच्या औषधे साधून निसर्ग संवर्धनाचा संदेश देण्यासाठी लायन्स क्लब पंढरपूर ड्रीमच्या वतीने शाळेला एक स्तुत्य भेट देण्यात आले शाळेच्या प्रांगणात लावण्यासाठी व परिसर अधिक सुंदर बनवण्यासाठी क्लब तर्फे विविध प्रकारच्या फुलांची रोपे शाळेला सुपूर्द करण्यात आली.




या कार्यक्रमाप्रसंगी कर्मवीर विद्यानिकेतन चे प्राचार्य प्रियदर्शनी सरदेसाई,

### लायन्स क्लब पंढरपूर ड्रीमच्या वतीने फुल झाडांची भेट

लायन्स क्लबच्या कोळवले मॅडम आणि खिस्ते मॅडम प्रामुख्याने उपस्थित होत्या व या मान्यवरांच्या अस्थिक प्रतिमापूजन व कार्यक्रम पार पडला व श्री पांडुरंग प्रतिष्ठानची विश्वस्त रोहन परिचारक यांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.

तसेच विद्यानिकेतन मध्ये सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी रजिस्टर गणेश वाळके उपस्थित होते व सर्वांच्या उत्साही सहभागाने हा जयंती सोहळा अत्यंत आनंदात आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

## तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयातील गैरकारभाराची फेरचौकशी करा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे/ बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी - सिंदखेडराजा : तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयातील गैरकारभार आणि यापूर्वी सादर केलेल्या पक्षपाती अहवालाची फेरचौकशी व्हावी, या मागणीसाठी गजानन कहाळे, बबन हरिभाऊ सरकटे व दिपक म्हस्के यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे.

तत्कालीन जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडून(ऊक्रज) यांनी चौकशीत चुकीचा खोटा स्वयंस्पष्ट अहवाल सादर करुन संशयितांना पाठीशी घातले जात असल्याचा आरोप करत तक्रारदारांनी येत्या १२ ऑक्टोबर २०२६ पासून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषणाला बसण्याचा इशारा दिला आहे.

तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयातील गैरकारभार, कर्मचाऱ्यांची अरेरावी आणि कार्यालयीन वेळेत कार्यालय बंद असणे, यासंदर्भात तक्रारदार गजानन बाबुराव कहाळे यांनी १५ सप्टेंबर २०२६ रोजी वरिष्ठाकडे अपील अर्ज दाखल केला होता. मात्र, यापूर्वीच्या चौकशी अधिकाऱ्याने जीपीएस पुरावे व प्रत्यक्ष वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करून दोषींना वाचवण्यासाठी बनावट अहवाल तयार केल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे. या अयोग्य अहवालावर १५ दिवसांत फेरचौकशी करून कारवाई न झाल्याने आता उपोषणाचा मार्ग निवडण्यात आला आहे.

तात्कालीन चौकशी अधिकाऱ्याचा खोटा व पक्षपाती अहवाल त्वरित रद्द करण्यात यावा. दुसऱ्या सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी मार्फत निष्पक्ष फेरचौकशी व्हावी. दोषी संबंधित कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची आणि निलंबनाची कडक कारवाई करण्यात यावी.

प्रशासनाच्या उदासीन धोरणामुळे अन्याय होत असल्याचे सांगत, तक्रारदार गजानन कहाळे, बबन हरिभाऊ सरकटे व दिपक म्हस्के यांनी बेमुदत आमरण उपोषणाची नोटीस दिली आहे.

### पावसाच्या तुटीमुळे खरीप हंगामातील पिकांच्या उत्पादनात घट

## दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर बोपगाव व चांबळी येथे पिकांचे व फळबागांचे संयुक्त पंचनामे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर/प्रतिनिधी डॉ. विनायक गायकवाड - महाराष्ट्र शासनाने राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या अनुषंगाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार (जीआर) पुरंदर तालुक्यातील बोपगाव व चांबळी गावातील सासवड महसूल मंडळात शासकीय यंत्रणेकडून युद्धपातळीवर पीक पाहणी व पंचनामे करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. पावसाच्या तीव्र तुटवड्यामुळे व दुष्काळजन्य परिस्थितीमुळे खरीप हंगामातील पिके घेवडा भाजीपाला सोयाबीन आणि प्रमुख फळपिकांचे उत्पादनातील घट दिसून आली आहे

ग्रामस्तरीय संयुक्त समितीने शेताच्या बांधावर प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली असता, उभ्या पिकांचे नुकसान तसेच येणाऱ्या १५ ते २० दिवसांमध्ये खरीप पिकांच्या उत्पादनात घट होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला




आहे. याशिवाय परिसरातील मुख्य फळपिके असलेल्या सीताफळ आणि पेरूच्या उत्पादनावरही दुष्काळाचा विपरीत परिणाम झाला असून फळधारणेत व उत्पादनात मोठी घट दिसून येत आहे. या सर्व परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत नुकसानग्रस्त भागाचे रीतसर पंचनामे करण्यात आले आहेत.

**ग्रामस्तरीय समिती व उपस्थित अधिकारी:**

सदर पीक पंचनाम्याच्या कार्यवाही प्रसंगी ग्रामस्तरीय समितीचे सदस्य व प्रशासकीय अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. यामध्ये सहाय्यक कृषी अधिकारी विजय जाधव, ग्रामपंचायत अधिकारी सचिन दुबळे व राखी ढगारे, तसेच ग्राम महसूल अधिकारी कल्पेश कटारे व दत्तात्रय जगदाळे यांनी संयुक्तपणे उपस्थित राहून परिस्थितीची बारकाईने नोंद घेतली.

बाधित शेतकऱ्यांची उपस्थिती:

पंचनाम्याच्या वेळी पिक पाहणी सहाय्यक सोनबा फडतरे व अमित जगदाळे देवेंद्र फडतरे तसेच प्रत्यक्ष नुकसानग्रस्त शेतकरी राहुल फडतरे कुंडलिक फडक्तरे, समीर फडतरे यांच्यासह परिसरातील इतर बाधित शेतकरी बांधव उपस्थित होते. शासकीय नियमानुसार पात्र शेतकऱ्यांना योग्य मदत मिळावी यासाठी सर्व पंचनामे वेळेत पूर्ण करून अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे सादर केला जात आहे.

# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचे १०० टक्के क्षेत्राचे सरसकट पंचनामे करावेत

## पंचनाम्यात एकही नुकसानग्रस्त शेतकरी वंचित राहू नये; अधिकाऱ्यांनी संवेदनशीलतेने काम करावे : पालकमंत्री जयकुमार गोरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/पंढरपूर, (जिमाका) : राज्य शासनाने सोलापूर जिल्ह्यातील अकराही तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. या पार्श्वभूमीवर दुष्काळी परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे जिल्ह्यातील विविध दुष्काळग्रस्त भागांना भेटी देत आहेत. आज त्यांनी सांगोला तालुक्यातील कटफळ येथे भेट देऊन दुष्काळामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून सर्वतोपरी मदत केली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शंभर टक्के क्षेत्राचे पंचनामे करा

दुष्काळामुळे ज्या शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले आहे, त्यांच्या शंभर टक्के क्षेत्राचे सरसकट पंचनामे करण्यात यावेत. यामध्ये केवळ पिकांचेच नव्हे, तर ऊस, फळबागा

**कटफळ (ता. सांगोला) येथे पीक नुकसानीची पाहणी; गार्डी गावाच्या पाणीपुरवठ्यासाठी तलावात पाणी सोडण्याचे निर्देश**

तसेच अन्य पिकांच्या नुकसानग्रस्त क्षेत्राचाही समावेश करावा. कोणताही नुकसानग्रस्त शेतकरी पंचनाम्यापासून वंचित राहणार नाही, याची प्रशासनाने दक्षता घ्यावी. पंचनामे करताना वस्तुस्थितीची अचूक नोंद घ्यावी. अशा आपत्तीच्या परिस्थितीत प्रशासकीय अधिकाऱ्यांनी संवेदनशीलता ठेवून जबाबदारीने काम करावे, असे स्पष्ट निर्देश पालकमंत्री श्री. गोरे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

गार्डी गावाच्या पाणीपुरवठ्यासाठी तलावात पाणी सोडण्याचे निर्देश

पंढरपूर तालुक्यातील गार्डी गावाला कासाळ ओढ्यावरील तलावातून पाणीपुरवठा केला जातो. दुष्काळी परिस्थितीत गावाच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी संबंधित तलावात पाणी सोडण्याबाबत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी जलसंपदा विभागाच्या अधीक्षक अभियंत्यांना आवश्यक कार्यवाही



करण्याचे निर्देश दिले. ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची उपलब्धता कायम ठेवण्यासाठी प्रशासनाने आवश्यक नियोजन करावे, असेही त्यांनी सूचित केले.

गुरसाळे येथे ग्रामस्थांचे निवेदन स्वीकारले

पंढरपूर तालुक्यातील गुरसाळे येथे पालकमंत्री श्री. गोरे यांनी थांबून ग्रामस्थांशी संवाद साधला. ग्रामस्थांनी यावेळी आपल्या विविध मागण्या व समस्या मांडणारे निवेदन त्यांना दिले. स्थानिक प्रश्नांची माहिती घेऊन संबंधित यंत्रणांनी त्याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, असे त्यांनी सांगितले. सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देणे, पीक नुकसानीचे अचूक मूल्यांकन करणे आणि ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची उपलब्धता निश्चित करणे याला शासनाचे प्राधान्य आहे. त्यामुळे सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून शेतकरी व नागरिकांना आवश्यक मदत वेळेत उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.

यावेळी आमदार बाबासाहेब देशमुख, माजी आमदार दीपक साळुंखे-पाटील, माजी आमदार शहाजी पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, प्रांताधिकारी अमित माळी, तहसीलदार बाळूबाई भागवत, तालुका कृषी अधिकारी दीपाली जाधव, गटविकास अधिकारी अमोल जाधव, योगेश कांबळे, पंढरपूरचे प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी व ग्रामस्थ-शेतकरी उपस्थित होते.

# कायदा जाणून घ्या, हक्क ओळखा!':अनाथ मुलांसाठी विधी विद्यार्थिनींचा स्तुत्य जनजागृती उपक्रम




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

मुलांमध्ये कायदेविषयक जागरूकता, आत्मविश्वास आणि आपल्या हक्कांची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने विधी जनजागृती अभियानांतर्गत समाजातील गरजू व वंचित घटकांसाठी २ ऑक्टोबर २०२६ रोजी विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे येथील व्ही.पी.एम.च्या टी.एम.सी. विधी महाविद्यालयातील विधी शाखेच्या विद्यार्थिनींनी खारघर, नवी मुंबई येथील गिरिजा कल्याणकारी संस्थेत अनाथ मुलांसाठी कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी ५ ते १६ वर्षे वयोगटातील मुलांना त्यांच्या कायदेशीर हक्कांसह सुरक्षितता, आरोग्य, पोषण आणि शिक्षण याबाबत विद्यार्थिनींनी सोप्या व मुलांना समजेल अशा भाषेत मार्गदर्शन केले.

बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण करणाऱ्या कायद्यांतर्गत मुलांच्या सुरक्षिततेबाबत भावना राऊत या विद्यार्थिनीने मार्गदर्शन केले. कोणत्याही प्रकारचा त्रास किंवा अत्याचार झाल्यास त्याबाबत विश्वासू व्यक्तीला माहिती देण्याचे महत्त्वही त्यांनी समजावून सांगितले. बाल न्याय विषयक कायद्यानुसार मुलांच्या आरोग्य व वैद्यकीय उपचारांशी संबंधित हक्कांबाबत श्रद्धा खोपे या विद्यार्थिनीने माहिती दिली. अन्न सुरक्षा कायद्यानुसार मुलांना मिळणाऱ्या अन्न व पोषणाच्या अधिकाराविषयी निधी गुप्ता या विद्यार्थिनीने मार्गदर्शन केले. तसेच शिक्षणाचा अधिकार कायद्यानुसार प्रत्येक मुलाला शिक्षणाचा अधिकार असल्याचे सांगत शिक्षणाचे महत्त्व हर्षिता बडे या विद्यार्थिनीने मुलांना समजावून सांगितले.

विधीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींनी आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजातील गरजू घटकांसाठी करून सामाजिक बांधिलकी जपली. कायदेविषयक माहिती मुलांपर्यंत सोप्या पद्धतीने पोहोचविण्याचा हा उपक्रम विशेष ठरला.

यावेळी गिरिजा खारघर कल्याणकारी संस्थेच्या संचालिका सुमित्रा कुंजार उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थिनींच्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले.

मुलांना त्यांच्या हक्कांची माहिती लहान वयातच मिळणे ही त्यांच्या सुरक्षित आणि सक्षम भविष्यासाठी महत्त्वाची बाब आहे. विधीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींनी आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजहितासाठी करीत कायदेविषयक जनजागृती करणे ही निश्चितच कौतुकास्पद आणि अनुकरणीय बाब असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले.

# विनोदातून समाजदर्शन; डॉ. दशरथ भोसले यांच्या दोन कथासंग्रहांचे प्रकाशन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : वयाच्या ७९व्या वर्षी ज्येष्ठ विनोदी लेखक डॉ. दशरथ दाजीराव भोसले यांच्या 'काकांना अटॅक येतो..!' आणि 'म्हातारपणाचं टॉनिक' या दोन विनोदी कथासंग्रहांचा प्रकाशन सोहळा पुण्यातील वीर बाजी पासलकर सभागृहात उत्साहात पार पडला. यावेळी डॉ. भोसले यांचा ज्येष्ठ साहित्यिक म्हणून डॉ. एस. एन. पठाण, माजी कुलगुरू, नागपूर विद्यापीठ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

डॉ. दशरथ भोसले हे एम.ए., पीएच.डी. असून कोकण कृषी विद्यापीठात सहाय्यक कुलसचिव म्हणून सेवा बजावून निवृत्त झाले आहेत. 'रथ मांगल्याचा' हे त्यांचे यापूर्वी प्रकाशित झालेले पुस्तक असून त्यांच्या साहित्यिक प्रवासात या दोन विनोदी कथासंग्रहांची भर पडली आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ. एस. एन. पठाण म्हणाले की, आजची पिढी आई-वडील, नातेवाईक आणि संस्कृतीपासून दूर जात आहे. त्यामुळे आपला सांस्कृतिक वारसा जपण्याची गरज आहे. डॉ. भोसले यांच्या दोन्ही कथासंग्रहांत समाजातील विविध वैगुण्यांवर विनोदी शैलीत भाष्य करण्यात आले आहे. हे विनोद केवळ हसविणारे नसून वाचकाला अंतर्मुख करून विचार करायला भाग पाडणारे आहेत. स्वार्थी वृत्तीमुळे नातेसंबंधांमध्ये निर्माण होणारी वेदना त्यांच्या लेखनातून विनोदाच्या माध्यमातून व्यक्त होते. कोकणातील संस्कृती, सण-उत्सव, माणसे आणि परस्परांतील जिव्हाळाही त्यांच्या लेखनातून प्रभावीपणे समोर येतो.




प्रमुख पाहुण्या तथा नेटल्स प्रकाशन, दिल्लीच्या मालक व प्रकाशक कुमारी अनुरंजिता पाठक यांनी सांगितले की, नवोदित लेखकांना संधी देण्याच्या उद्देशाने प्रकाशन संस्था सुरू करण्यात आली आहे. डॉ. भोसले यांच्या पुस्तकांचे संपादन करताना त्यांच्या विषयांची निवड आणि लेखनातील वेगळेपण सातत्याने जाणवले.

डॉ. भारत द. कऱ्हाड यांनी या पुस्तकांच्या निर्मितीमागील प्रवास सांगताना म्हटले की, विविध सभा आणि कार्यक्रमांमध्ये डॉ. भोसले यांच्या बोलण्यातून त्यांची विनोदी शैली प्रकर्षाने जाणवत असे. त्यामुळे त्यांना 'आपण लिहीत का नाही?' असे विचारले. त्यावर डॉ. भोसले यांनी 'मी लिहीन, तुम्ही मला मदत करा,' असे सांगितले. त्यानंतर सलग ५२ आठवडे, दर रविवारी एक विनोदी कथा लिहून घेण्यात आली. या लेखनातूनच या दोन कथासंग्रहांची निर्मिती झाली. या उपक्रमासाठी परळी येथील संपादक मोहन व्हावळे यांच्या 'संघर्ष नेता' या वृत्तपत्राचे सहकार्य लाभल्याचे डॉ. कऱ्हाड यांनी सांगितले.

आपल्या मनोगतात डॉ. दशरथ भोसले यांनी प्राचार्य डॉ. भारत द. कऱ्हाड हे या पुस्तकांच्या निर्मितीमागील प्रेरणास्थान असल्याचे सांगितले. पत्नी, सून, मुलगा, मुलगी आणि नातू यांच्या प्रेरणेमुळे लेखन सुरू ठेवता आले. दर आठवड्याला लिहिलेली कथा कुटुंबीयांना वाचून दाखवली जात असे आणि त्यांच्या सूचनांमुळे लेखन अधिक समृद्ध होत गेले. कोकण कृषी विद्यापीठातील सहकाऱ्यांनीही दर रविवारी प्रसिद्ध होणाऱ्या लेखाला मनापासून दाद दिल्याने लेखनाची प्रेरणा मिळत राहिली. 'लेखन आणि नातू हे दोन्ही आता माझ्या म्हातारपणाचे टॉनिक झाले आहे,' असे भावपूर्ण उद्गार त्यांनी काढले.

यावेळी ॲड. वैशाली नितीन भोसले यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आरोही प्रशांत शिंदे आणि अदा युवराज शिंदे यांनी गणेशवंदना सादर केली.

या कार्यक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे लेखकाच्या कुटुंबातील तीन पिढ्या एकत्रितपणे उपस्थित होत्या. कार्यक्रमास पुणे शहर काँग्रेसचे उपाध्यक्ष श्री. आबा जगताप, डॉ. सुधाकर न्हाळदे, प्राचार्य डॉ. अनिल अडसुळे, माजी प्राचार्य डॉ. राजेश कुचेकर, डॉ. सुरेश वाघमारे, डॉ. अशोक कांबळे, डॉ. स्नेहलता तावरे, डॉ. परेश वाघमारे, डॉ. सुवर्णा कराड, श्री. विलास घडवले, उमीत तळेकर, सौ. योगिता मधुकर कदम, संजीवनी गावणकर, सौ. प्रितम, ओंकार विचारे, निशीका नितीन भोसले, संयोजक नितीन भोसले, युवराज भोसले, ॲड. सौ. वैशाली नितीन भोसले यांच्यासह भोसले कुटुंबीय तसेच साहित्य, कला आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन सौ. शिल्पा प्रशांत शिंदे यांनी केले. आभार प्रदर्शन सौ. सोनाली राजकुमार मगर यांनी केले. वयाच्या ७९व्या वर्षी दोन विनोदी कथासंग्रह प्रकाशित होणे आणि लेखकाच्या कुटुंबातील तीन पिढ्यांची उपस्थिती यामुळे हा सोहळा डॉ. दशरथ भोसले यांच्या साहित्यिक वाटचालीतील एक संस्मरणीय टप्पा ठरला.

# पुणे पदवीधर मतदारसंघ निवडणुकीसाठी स्मिता जाधव व हर्षदा जाधव यांच्यात लढत होण्याची शक्यता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : पुणे पदवीधर मतदारसंघ निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टी कडून श्रीमती स्मिता योगेश जाधव यांची उमेदवारी जाहीर झाली आहे स्मिता जाधव या पुढारी समूहाच्या योगेश जाधव यांच्या पत्नी तथा सतेज बंटी पाटील यांच्या भाच्या आहेत.

दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाकडून हर्षदा जाधव यांचे नाव जवळपास निश्चित झाले आहे हर्षद जाधव या माझी संधी अधिकारी प्रभाकर देशमुख यांच्या कन्या आहेत तथा कल्याण जाधव ग्रुपचे सर्वेसर्वा यांच्या सूनबाई आहेत.




पुणे पदवीधर मतदारसंघ पुणे सातारा सांगली कोल्हापूर आणि सोलापूर असा पाच जिल्ह्यात आहे या पाच जिल्ह्यात मिळून जवळपास तीन लाख ११ हजार मतदार आहेत. तर प्रचंड मोठा भक्कम राजकीय वारसा असलेल्या दोन्ही उमेदवार या मतदारसंघात समानासमोर लढतील पुणे पदवीधर मतदारसंघाच्या पैकी कुणाच्या पारड्यात स्वतः:ची मत टाकतील असे तुम्हाला वाटते?

**फार्मसी महाविद्यालयांतूनही डॉ.रोंगे सरांना भरघोस प्रतिसाद**

# करवीर तालुक्यात डॉ. बी. पी. रोंगे सरांच्या शिक्षक संवादाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोल्हापूर : पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्वेरीचे संस्थापक व स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बब्रुवाहन पांडुरंग रोंगे यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यातील विविध शाळा व महाविद्यालयांना भेटी देऊन शिक्षकांशी थेट संवाद साधला. या भेटीदरम्यान त्यांनी शिक्षकांच्या विविध समस्या, प्रलंबित प्रश्न आणि शैक्षणिक क्षेत्रातील अडचणी जाणून घेतल्या तसेच सुसंस्कार हायस्कूलचे मुख्याध्यापक सुजय देसाई व कोरगांवकर हायस्कूलचे मुख्याध्यापक संजय सौंदलगे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली व समस्या जाणून घेतल्या व यावर सविस्तर चर्चा केली. चर्चेतून डॉ. रोंगे सरांना त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.





गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट (स्वेरी) चे संस्थापक, स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य तसेच स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे अध्यक्ष डॉ. बी. पी. रोंगे हे पुणे विभागातील सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे व सोलापूर या पाचही जिल्ह्यांतील शिक्षकांशी संवाद साधत आहेत. या संवादाच्या माध्यमातून ते शिक्षकांच्या समस्या जाणून घेऊन त्यांचे प्रश्न शासन स्तरावर मांडण्यासाठी प्रयत्नशील आहेत. याच अनुषंगाने डॉ. रोंगे सर यांनी करवीर तालुक्यातील कोरगांवकर हायस्कूल, डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ इंटिरिअर डिझाइन, छत्रपती शाहू कॉलेज कदमवाडी, भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कॉलेज ऑफ फार्मसी व कॉलेज ऑफ लॉ, केआयटी कॉलेज, सुसंस्कार हायस्कूल, प्रिन्सेस इंदुमतीदेवी गर्ल्स हायस्कूल, सौ. एस. एम. लोहिया कॉलेज आणि देशभक्त रत्नाप्पा कुंभार नाईट कॉलेज या शैक्षणिक संस्थांना भेटी दिल्या. याशिवाय सिये हायस्कूल, भैरवनाथ हायस्कूल, भुयेवाडी, जिनियस पब्लिक स्कूल भुयेवाडी, देवी पार्वती हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, वडगणे, केरली हायस्कूल केरली, ज्योतिर्लिंग विद्यालय, वडणगे, ग. गो. जाधव विद्यालय केरली, हनुमंत विद्यालय केरली आणि एस. के. पाटील महाविद्यालय, प्रयाग चिखली या शैक्षणिक संस्थांनाही भेटी देऊन तेथील शिक्षकांशी संवाद साधला. या भेटीदरम्यान सुसंस्कार हायस्कूल, कोल्हापूरचे मुख्याध्यापक सुजय देसाई यांच्या निवासस्थानी डॉ. रोंगे सर यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी डॉ. रोंगे सर यांच्या हस्ते सुजय देसाई यांचा सत्कार करण्यात आला तसेच त्यांच्याशी शैक्षणिक क्षेत्रातील विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्याचप्रमाणे कोरगांवकर हायस्कूल, कोल्हापूरचे मुख्याध्यापक श्री. संजय सौंदलगे यांच्या निवासस्थानीही डॉ. रोंगे सर यांनी सदिच्छा भेट देऊन त्यांचा सत्कार केला. यावेळी शिक्षकांच्या समस्या व शैक्षणिक क्षेत्रातील विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.या भेटीदरम्यान शिक्षकांच्या सेवाविषयक समस्या, टीईटी, जुनी पेन्शन योजना, पदोन्नती, नियुक्ती व इतर प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. शिक्षकांच्या समस्या अभ्यासपूर्ण पद्धतीने शासन स्तरावर मांडून त्यांचा पाठपुरावा करण्याची आवश्यकता असल्याचे डॉ. रोंगे सर यांनी यावेळी स्पष्ट केले. स्वेरी, एसव्हीआयटी आणि स्वाईप या शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून डॉ. रोंगे सर यांनी राबविलेल्या विविध शैक्षणिक उपक्रमांमुळे शिक्षकांमध्ये त्यांच्या कार्याबाबत अपेक्षा निर्माण झाल्या आहेत. शिक्षकांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर योग्य तो पाठपुरावा करण्याच्या उद्देशाने त्यांनी करवीर तालुक्यातील विविध शाळा व महाविद्यालयांना भेटी दिल्या. या भेटींमध्ये विविध शैक्षणिक संस्थांचे पदाधिकारी, प्राचार्य, मुख्याध्यापक व शिक्षक सहभागी झाले होते. यावेळी डॉ. बी. पी. रोंगे सर यांनी शिक्षकांच्या विविध प्रश्नांचा अभ्यास करून ते शासन स्तरावर मांडण्याची आपली भूमिका स्पष्ट केली. शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी जिद्द, चिकाटी आणि प्रामाणिक प्रयत्न करण्याची ग्वाही त्यांनी दिली.